# राष्ट्रीय अंधत्व निवारण कायक्रम

## नेत्रदान

योजनेची माहिती :-बुबुळाचे टाकेमुळे येणारे अंधत्व टाळण्यासाठी नेत्ररोपण शस्त्रक्रिया केल्यामुळे दृष्टी प्रदान करता येते

योग्यता :-बुबुळाला टिक पडण्याची कारणे

१) अ जीवनसत्वाचा अभाव
२) डोळे येणे
३) बुबुळा वर होणारी जखम (जळणे ,धन्युष्यबाणामुळे ,फटाक्यामुळे,मार लागल्यामुळे )
४) चुना , रसायन ,कचरा गेल्यामुळे

वरील कारणामुळे बुबुळावर टिक पडून अंधत्व आल्यास नेत्रदानाने जमा झालेले नेत्रामधील बुबुळ काढून रुग्णावर नेत्ररोपण शस्त्रक्रिया करता येते .यामुळे अंध रुग्णांना दृष्टी प्रदान करता येते

आवशक्य कागद पत्रांची यादी :-मृत्युनंतर नेत्रदान करणेसाठी नातेवाईकाची समंती आवश्यक असते
डॉक्टरांकडून रुग्णांचा मृत्यूचा दाखला

नेत्रदान कोण करू शकते :-एक वर्षावरील कोणताही व्यक्ती नेत्रदान करू शकतो.नेत्रदान साठीइचापत्र लिहून दिले असल्यास त्या व्यक्तीच्या मृत्यू नंतर त्यांचे नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांनी पुढील कायवाही करायला हवी मोतीबिंदू शस्त्रक्रिया मधुमेह उच्चरक्तदाब चष्मावापरत असलेले व्यक्ती हि नेत्रदान करू शकतात मृत्यू नंतर जास्तीत जास्त ६ तासान मध्ये मृत्य व्यक्तीचे डोळे नेत्र बँकेतजमा करता येतात

नेत्रदानाबाबत आवश्यक माहिती :-१ एक वर्षावरील कोणताही व्यक्ती नेत्रदान करू शकतो
२ मृत्यूनंतर नेत्रदान केल्या जाते
३ मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे दोन्ही डोळे झाकून त्यावर कापसाचा बोळा ठेवावा
४ पंखा चालू असल्यास तो बंद करावा
५ शक्य असल्यास अधूनमधून सूक्ष्म जंतुनाशकाचे थब मृत पावलेल्या व्यक्तीच्या डोळ्यामध्ये टाकावे. त्यामुळे संसग होण्याचा धोका कमी होतो
६ मृत पावलेल्या व्यक्तीचे डोके अंदाजे ६ इंच वर उचलून ठेवावे असे केल्याने डोळे काढताना रक्तस्त्राव टाळता येईल

नेत्रदान साठी संपक :-

१. नेत्र संकलन कद्र श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्याल व रुग्णालय यवतमाळ दूरध्वनी क्रमांक ०७२३२-२४५४०७, कु. सोनाली घायवान नेत्र समुपदेश ८१८०८२७३१५
२. दिशा नेत्र संकलन कद्र संजीवन हॉस्पिटल यवतमाळ श्री स्वप्नील गावंडे ९४२३४२४४५०
३. श्री वरद नेत्रालय पुसद डॉ. जयंत भोपी ९८२२८९९७९६

# नेत्रदान संमतीपत्र



जगातील अंधापैकी २० टक्के भारतात आहेत. महाराष्ट्रात दर लाख लोकसंख्येत ४५० माणसे आंधळी आहेत. फुल पडल्यामुळे (अपारदर्शक बुब्बुळामुळे) आंधळेपण आले असल्यास बुब्बुळावर शस्त्रक्रिया करुन आंधळ्या माणसाला दृष्टी देता येते.

मृत्युनंतर सहा तासांत (शक्यतो दोन तिन तासांत) डोळे काढून घ्यावे लागतात. मृत्यूनंतर आय बँकेला/आय डोनेशन सेंटरला फोन करून डॉक्टरांना ताबडतोब बोलवावे. दहा ते पंधरा मिनिटांत सर्व काम डॉक्टर करतात. त्यानंतर चेहरा विद्रुप दिसणार नाही अशी काळजी घेण्यात येते.

तुमच्या नेत्रदानामुळे आंधळ्या व्यक्तीला दृष्टिची मोठी देणगी मिळते व तुम्ही नेत्ररूपाने चिरजीव होता. खालील फॉर्म भरून आय डोनेशन सेंटरला पोस्टाने पाठवावा किंवा प्रत्यक्ष भेटावे.

:अधिक माहितीसाठी लिहा :

**आय डोनशन सेंटर, नेत्र विभाग**

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय रूग्णालयव महाविद्यालय, वार्ड नं.१६, यवतमाळ-४४५००१

## मृत्युनंतर नेत्रदानासाठी संमती

**श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय रूग्णालयव महाविद्यालय, यवतमाळ, फोन नं. ०७२३२-२४५६९८**

मी असे लिहून देतो/देते की माझ्या मृत्युनंतर स्वःखुशीने मी नेत्रदान करू इच्छितो/इच्छिते, म्हणुन हॉस्पीटल मधील नेत्रपेढीसाठी माझ्या डोळ्यांचा उपयोग करण्यात यावा कोणत्याही अंध व्यक्तीला दृष्टी देण्यासाठी किंवा प्रतिबंध संशोधना साठी किंवा नेत्ररोग निवारणासाठी डोळ्यांचा उपयोग करण्यात माझी संमती आहे.

संपूर्ण नांव :-........................................................................................ वय ..................

पत्ता व टेलीफोन नं. ..........................................................................................................

सही .............................

साक्षीदार :-

१) जवळचे नातेवाईक

नाव पत्ता ..................................................

सही .............................

साक्षीदार :-

२) नातेवाईक किंवा मित्र

नाव पत्ता ..................................................

सही ............................

**मरावे परी नेत्र रूपी उरावे...**

# राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कायक्रम सामान्य रुग्णालय यवतमाळ

मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया :-

१.मोतीबिंदू निदान चे एकून कद्र :- सव ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय १७

सव प्राथमिक आरोग्य कद्र २८

वरील सव ठिकाणी रुग्णांची नेत्र तपासणी करून चष्म्याचे नंबर काढून दिले जातात व डोळ्याचे आजारावर प्राथमिक उपचार केल्या जातो .मोतीबिंदूचे निदान करून रुग्णाला मोतीबिंदू शस्त्रक्रियेकरिता संदभित करून त्यांचेवर मोफत शस्त्रक्रिया केला जाते .राष्ट्रीय बाल स्वास्थ कायक्रमा अंतगत अनुदानित शाळेतील विद्याथ्याची तपासणी पथकाकडून केल्या जाते व नेत्रविकार असलेल्या विद्यार्थी यांना वरील कद्रावर तपासणी साठी पाठविले जाते.चाश्माच्या नंबर सहित चष्मा मोफत दिला जातो.विद्याथ्याना शस्त्रक्रियेची गरज असल्यास त्यांना राजीव गांधी जीवनदायी योजनेतगत रुग्णालयात व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कायक्रम मोफत शस्त्रक्रिया केल्या जातात

२. जिल्ह्यातील एकून नेत्र पथके :- १- सामान्य रुग्णालय यवतमाळ

२- उपजिल्हा रुग्णालय पुसद

३- जिल्ह्यातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे ठिकाण:-१. श्री.वसंतराव नाईक शासकाय वैद्यकाय महाविद्याल व रुग्णालय यवतमाळ

२. आयुर्वादक कॉलेज यवतमाळ

३. उपजिल्हा रुग्णालय पुसद,

४. उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा

५. उपजिल्हा रुग्णालय दारव्हा

४. जिल्ह्यातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेकरिता स्वयंसेवी संस्था:- महात्मे नेत्र रुग्णालय नागपूर

उपरोक्त ठिकाणी मोफत मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया कॅम्पचे दिवशी केल्या जातात .मोतीबिंदू शस्त्रक्रिये करिता रुग्णांना भरती केल्या जाते व दुसऱ्या दिवशी शस्त्रक्रिया करून तिसऱ्या दिवशी सुट्टी दिल्या जाते.